# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - २
## सभावृत्तांत

दिनांक - ७/५/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.**०७/०५/**२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.बारणे अर्चना तानाजी
६. मा. अभिषेक गोविंद बारणे
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१०. मा.सुनिता हेमंत तापकीर
११. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१२. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१३. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
१४. मा.विनोद हनुमंत तापकिर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.नितीन निंबाळकर , श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.साबळे बी आर-उपअभियंता, श्री.किशोर महाजन – उपअभियंता (जलनि:सारण) श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कलाल आय के – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.आर एम बेद – आरोग्य,श्री.गणेश राऊत,श्री.शिर्के एस व्ही,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता, श्री.बी के

तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.कुलकर्णी एस बी – लेखाधिकारी,श्री.कोळप श्रीकांत - अतिक्रमण,श्री.शिंदे एस डी – मुख्याध्यापक (माध्यमिक शिक्षण) , श्रीमती जोशी ए एम – पर्यवेक्षिका (शिक्षण विभाग) इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती**- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

**ग प्रभाग समितीचे माजी अध्यक्ष मा.श्री.अभिषेक बारणे यांनी ग प्रभाग समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा.श्री.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन यांचे ग प्रभाग समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.**

**मा.सभापती यांनी ग प्रभाग समिती सदस्य तसेच नामनिर्देशित स्वीकृत सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली.**

१) दि. ५/३/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ९ ) कायम करणेत आला.
२) दि.२६/४/२०१८ रोजीचे विशेष सभेचा सभावृत्तांत ( नामनिर्देशित स्वीकृत सदस्य निवड) कायम करणेत आला.
३) दि.२७/४/२०१८ रोजीचे विशेष सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र.१) कायम करणेत आला.

-------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- १
दिनांक - ७/०५/२०१८
सूचक- मा. अनुमोदक – मा.

संदर्भ – मा.उषा वाघेरे यांचे दिनांक ३/०२/२०१८ चे पत्र..

मा.उषा वाघेरे यांनी दिनांक ३/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलावास " श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(मा.उषा वाघेरे यांनी दि.७/५/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.)

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक- २
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/३७१/२०१८ यांचे दिनांक २८ /०३ /२०१८ चे पत्र..

कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/३७१/२०१८ दि.२८/३/२०१८ चे पत्रान्वये श्री.एॅड सुभाष सावन माछरे यांची सदस्य दूरसंचार सल्लागार समिती भारत सरकार म्हणुन पुणे जिल्हयासाठी निवड झाली असुन त्यांचे नावाचे एकुण दोन नामफलक लावणेबाबत संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. तरी सदरचा नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

(सदस्यांचे नामफलक लावणेबाबत जे काही नियम असतील ते माहिती करुन घ्यावे व त्यानुसार नामफलक लावणेबाबत स्थापत्य विभागाने कार्यवाही करावी)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक- ३

दिनांक- ७/०५/२०१८

सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.चंद्रकांत नखाते

संदर्भ – मा. संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्र

मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र.२१ मधील जिजामाता हॉस्पिटल जवळ उभारण्यात आलेल्या कमानीस "**शिवस्फुर्ती स्मारक पिंपरी वाघेरे गावाकडे**" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(सदर विषयाबाबत स्थापत्य विभागाने माहिती घेऊन कार्यवाही करावी)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक- ४

दिनांक- ७/०५/२०१८

सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा. संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्र

मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्रमांक २१ मधील पिंपरी वाघेरे गावातील नव्याने विकसित होणा-या १८ मीटर डी पी रस्त्यामध्ये लक्ष्मी रेसिडन्सी जवळील चौकामध्ये " **धर्मवीर संभाजी महाराज स्मृती शिल्प** " उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

(सदर विषयाबाबत स्थापत्य विभागाने पाहणी करुन, माहिती घेऊन कार्यवाही करावी.)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक- ५

दिनांक- ७/०५/२०१८

सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा. संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्र

मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्रमांक

२१ मधील पिंपरी वाघेरे गावाला कुस्ती खेळाने नावलौकिक मिळवुन दिलेला आहे. राज्यपातळीवर खेळणारे मल्ल या गावामध्ये घडलेले आहेत. येणा-या नवीन तरुण पिढीला प्रोत्साहन मिळणेसाठी **पवनेश्वर चौक, कापसे आळी येथे कुस्ती शिल्प** उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.
(स्थापत्य विभागाने वाहतुक विभागाकडुन माहिती घेऊन सदर विषय मंजुर करण्यात येईल)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक- ६
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा. संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्र

मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार (प्रभाग क्र.२१)पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे मिलिंदनगर येथे पुनर्वसन प्रकल्प उभारण्यात आला होता. सदर प्रकल्पाच्या जवळ "**सुभेदार रामजी आंबेडकर नगर, मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्प"** या नावे कमान उभारण्यात यावी. तसेच सदर प्रकल्पाच्या बाजूच्या नाल्यावर स्लॅब टाकण्यात आलेला आहे, त्याठिकाणी हॉकर्स झोन विकसीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(सदर विषयाबाबत स्थापत्य विभागाने सदर जागेची पाहणी करुन तेथील परिस्थिती पाहुन सविस्तर माहिती घ्यावी व त्यानंतर कार्यवाही करावी.)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक- ७
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.निकिता कदम अनुमोदक – मा.मनिषा पवार

**संदर्भ –** मा. कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/४५०/२०१८ दि.२८/४/२०१८ चे पत्र

कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/४५०/२०१८ दि.२८/४/२०१८ चे पत्रानुसार श्री.संभाजी बाळासाहेब बारणे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदी व श्रीम.मनिषा संभाजी बारणे यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी नुकतीच निवड झाली असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. तरी त्यांचे नावाचे एकत्रित एकुण चार नामफलक लावणेबाबत मागणी केली आहे. तरी सदरचा नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक- ८
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.निकिता कदम अनुमोदक – मा.मनिषा पवार

**संदर्भ –** मा. निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्र

मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील मिलिंदनगर पुर्नवसन प्रकल्प याला **"सुभेदार रामजी आंबेडकर वसाहत"** हे नाव कमान टाकुन नाम दर्शविण्यात यावे असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे तरी सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १०	विषय क्रमांक- ९
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.निकिता कदम	अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा. निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्र

मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार जिजामाता चौकात तीन ठिकाणी रस्ते फुटतात, याठिकाणी वाहनांची ये जा जास्त प्रमाणात होत असल्याकारणाने या ठिकाणी कसल्याही प्रकारचा धोका होऊ नये, तसेच जय हिंद हायस्कुल मधील येणा-या जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे या ठिकाणी ग्रेडसेपरेटर टाकण्याची गरज आहे. तरी सदर ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - ११	विषय क्रमांक- १०
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.निकिता कदम	अनुमोदक – मा.मनिषा पवार

**संदर्भ –** मा. निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्र

मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पिंपरी गावातील पवनेश्वर चौक येथे नाव देणेत यावे अशी मागणी येथील नागरिक करत आहे. त्यांच्या मागणीनुसार "**पैलवान भाऊसाहेब महादेव कापसे**" असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - १२	विषय क्रमांक- ११
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.निलेश बारणे	अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

**संदर्भ –** मा.निलेश बारणे यांचे दिनांक ७/०५/२०१८ चे पत्रानुसार

मौजे थेरगाव येथील लोकसंख्या दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत आहे. परंतु त्या ठिकाणी पोस्ट ऑफिस साठी जागा उपलब्ध नाही. तरी थेरगाव येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्वतंत्र बांधकाम असलेली इमारती मध्ये पोस्ट ऑफिससाठी जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक- १२
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

**संदर्भ –** मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ७/०५/२०१८ चे पत्रानुसार

प्रभाग क्र.२३ थेरगाव गावठाण मधील सर्व्हे नं.९ अंतर्गत आरोग्य कोठी व पोलिस चौकी शेजारील बहुउद्देशीय इमारतीचे आरक्षण असलेले जगतापनगर येथील मोकळया मैदानास "**श्री बापुजीबुवा क्रिडांगण , ग्रामदैवत बापुजीबुवा गाव जत्रा मैदान, थेरगाव**" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( सदर जागेसंदर्भात कोर्ट केस सुरु असुन त्याविषयी कागदोपत्री माहिती घेऊन स्थापत्य विभागाने कार्यवाही करावी. )

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक- १३
दिनांक- ७/०५/२०१८
सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

**संदर्भ –** मा.सुनिता तापकिर यांचे दिनांक ७/०५/२०१८ चे पत्रानुसार

प्रभाग क्र.२७ मधील तापकिरनगर सर्व्हे नं.७२ व ७३ मध्ये कलम २०५ अंतर्गत ७.५० मीटर रस्ता टाकलेला आहे. तरी या रस्त्याची त्या ठिकाणी अजिबात आवश्यकता नाही. सर्व्हे नं.७२ ला पुर्वेस १२ मीटर, पश्चिमेस ९ मी व दक्षिणेस ९ मीटर चा रस्ता सध्या आहे. तसेच या २०५ अंतर्गत ७.५० मीटर रस्त्यामुळे सर्व्हे नं.७३ मध्ये ३० वर्षापासुनची घरे बाधीत होत आहेत. तरी त्या नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व्हे नं.७२,७३ मधील २०५ अंतर्गत ७.५० मीटरचा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

( नगररचना विभागाच्या नियमानुसार माहिती घेऊन विषय मंजुर करणेत यावा)

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

दि.७/०५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

(ग प्रभागतील नामनिर्देशित स्वीकृत सदस्य यांना सर्व अधिकारी कर्मचारी यांची ओळख करुन देणेत आली.)

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन -** ग प्रभाग समिती मासिक सभेस सर्व संबंधित अधिका-यांची उपस्थिती आवश्यक आहे. आजपर्यंत झालेल्या मासिक सभेमध्ये वारंवार सुचना केलेप्रमाणे अनुपस्थित संबंधित अधिका-यांवर कारवाई करणेत यावी.

**मा.निकिता कदम –** विषय क्रमांक ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रभाग क्र.२१ येथील मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्पाच्या बाजुला हॉकर्स झोन विकसित करण्यात येऊ नये, सदर जागा ही विहारासाठी ठेवली आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – मिलिंदनगर येथील जागेबाबत पाहणी करण्यात यावी तसेच झोनिपु विभागात चौकशी करणेत यावी.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – विषय क्रमांक २ संदर्भात सदस्यांचे नामफलक लावणेबाबत जे काही नियम असतील ते माहिती करुन घ्यावे व त्यानुसार नामफलक लावणेत यावे.

**मा.संदिप वाघेरे** – विषय क्रमांक ६ संदर्भात स्थापत्य विभागाने माहिती घेऊन चौकशी करावी. मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्पाच्या जवळ ५० टप-या बसतील एवढी जागा आहे, तरी त्याठिकाणी हॉकर्स झोन असावा अशी तेथील नागरिकांची मागणी आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – सदर जागेची पाहणी करावी.

**मा.अभिषेक बारणे** – ग प्रभाग येथील पार्किंगमध्ये पोस्ट ऑफिससाठी जागा आहे, त्याबद्दल विचार करण्यात यावा.

**मा.निलेश बारणे** - जागेची उपलब्धता पाहणी करुन विषय मंजुर करण्यात यावा.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – स्थापत्य विभागाने सन्मा.सदस्यांनी मागणी केलेल्या कामांची माहिती द्यावी.

**श्री.ओहोळ (उपअभियंता)** - नगरसदस्यांशी संपर्क साधुन त्याप्रमाणे प्रभागातील कामे पुर्ण करण्यात येतील.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – औष्णिक धुरीकरणाचे काम सुरु आहे.

**मा.सुनिता तापकिर** – औष्णिक धुरिकरण करणारे कर्मचारी लिक्वीड संपले कि काम बंद करतात, ४ ते ५ कॉलनी पैकी एकच कॉलनीत धुरीकरण होते, त्यामुळे कर्मचा-यांना पुरेशी साधन सामुग्री पुरविण्यात यावी.

**मा.संदिप वाघेरे** – प्रभाग क्र.२१ व तेथील नदीपात्रही मोठे आहे.. सदर विभागात मच्छरांचे प्रमाण जास्त असल्याने, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पावसाळयापुर्वी योग्य ती उपाययोजना लवकरात लवकर करण्यात यावी.सुभाषनगर येथे क्लीनिंग मशिन फिरविण्यात यावे, आरोग्य मुख्यालयाकडुनही वेळेत कामे व्हायला हवी.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – भांडार विभागाकडे मशीन उपलब्ध असल्यास त्वरीत काम करुन घेण्यात येईल.

ज्या विभागातील अधिकारी सभेस उपस्थित नाहीत, त्यांचेबद्दल माहिती देण्यात आली

**मा.निलेश बारणे** – BRT विभागाकडुन Left Turn Free करण्याचे काम झालेले नाही.

**मा.श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – BRT चे इंजिनिअर्स सभेला उपस्थित राहत नाही, याकरीता त्यांना Show cause देण्यात येईल. Left Turn Free करण्याबद्दल वेळोवेळी मा.आयुक्त यांचेमार्फत मिटींगचे आयोजन केले जाते. सदर मिटींग मध्ये मी ग प्रभागासंदर्भात हा मुद्दा मांडेल. या विषयाबाबत माहिती घेऊन पुढील मिटींगला तसे स्पष्टीकरण देण्यात येईल.

**मा.संदिप गाडे** – पावसाळयापुर्वी रस्त्यांच्या संदर्भात काय उपाययोजना करणार आहेत याची माहिती द्यावी.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** - याबाबत स्थापत्य व आरोग्य विभागाने योग्य ती माहिती द्यावी.

**श्री.ओहोळ (उपअभियंता)** - नगरसदस्यांशी संपर्क साधुन त्याप्रमाणे प्रभागातील कामे पुर्ण करण्यात येतील.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – एकुण १० नाले आहेत. त्यात ७०% काम झालेले आहे, बाकी स्टॉर्म वॉटरचे काम सुरु आहे. निविदा प्रसिध्द झाल्यानंतर उर्वरित काम सुरु होईल.

**मा.निलेश बारणे** – मिटींगला BRT चे अधिकारी उपस्थित नसतात. बीआर टी व स्थापत्य च्या कामाचे नीट नियोजन होत नाही.बीआरटी विभागास योग्य तो पत्रव्यवहार करण्यात यावा.

**मा.गोपाळ माळेकर** – (प्रभाग क्र.२७) प्रभाग क्र.२७ मध्ये चेंबर चोक अप आहे, त्यासाठी गाडी यायला महिना लागतो यासंदर्भात योग्य ती उपाययोजना करावी.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – १ गाडी २ दिवस एका वॉर्डला देण्यात येईल व Emergency असेल तरच सदर गाडी दुस-या वॉर्डला जाईल अशी व्यवस्था करतो.

**मा.चंद्रकांत नखाते** – रहाटणी शाळा क्र.५५ येथे Under Ground पाण्याची टाकी लवकरात लवकर बसविण्यात यावी.

**मा. निलेश बारणे** - विषय क्रमांक १२ चे संदर्भात आपण सदर जागेसंदर्भात कोर्ट केस सुरु असतांना त्या विषयी कागदोपत्री व्यवहार करता येतील का, याचा खुलासा करावा. अशाप्रकारे कोर्ट केस सुरु असतांना जागेचे कुठलेही नामकरण करणे उचित ठरणार नाही.

**मा.अर्चना बारणे** – विषय क्रमांक १२ – संदर्भिय जागेवरील वाढते अतिक्रमण लक्षात घेता तेथे थोडीफार डागडुजी करुन सदर जागेचा उपयोग व्हावा.

**मा.निलेश बारणे** – सदर जागा हि तात्पुरती देण्यात आली होती.

**मा.अध्यक्ष –** सदर जागेबाबत संबंधित विभागाने कायदेशीर बाबी तपासुन अडचण आल्यास ठरावात फेरबदल करावे.

**मा.श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** बहुउद्देशीय प्रकल्पासाठी तात्पुरती जागा देता येते का हे कायदा विभागास विचारता येईल.

**मा.अभिषेक बारणे** - सदर जागेची डागडुजी करुन सदर विषय मंजुर करण्यात यावा.

**पावसाळी नाले साफसफाई**

**मा.श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने पावसाळी गटर्स व नालेसफाईचे काम आरोग्य व ड्रेनेज विभाग यांनी समन्वयाने करायचे आहे.

१) प्रभाग क्र.२१ मध्ये रेल्वे लाईन भडकवार निवास ते राधिका चौक देशी मिलिंद नगर वसाहती पर्यंतच्या नाल्याचे ७०% काम झाले आहे.

२) प्रभाग क्र.२३ मध्ये पवारनगर कुणाल सोसायटी पासुन पवना नदीपर्यंतच्या नाल्याचे ८०% काम झालेले आहे.

३) प्रभाग क्र.२३ तुळजाभवानी माता मंदीराजवळील मोरीपासुन एम एम शाळा नदीपर्यंतच्या नाल्याचे काम ९०% झालेले आहे

४) प्रभाग क्र.२४ मधील गोल्डन विला सोसायटी ते गंगा आशियाना मेडोस पर्यंत चिंचवड स्टेशन रोड या नाल्याचे ७०% काम झालेले आहे. सदर नाल्याची स्थापत्य व ड्रेनेज विभागाने नीट पाहणी करावी ज्यामुळे तो ओपन करुन आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी यांना साफसफाई करता येईल. ४ ते ५ दिवसात व्यवस्था करावी.

५) प्रभाग क्र.२७ मधील अनंत पार्क ते दर्शन पार्क ते वृंदावन नाला ८०% क्लीन केला आहे.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** - उर्वरीत चेंबर्स ठेकेदाराकडुन क्लीन करणार आहोत.

थोडयाफार किरकोळ दुरुस्त्या आहेत त्या लवकरच केल्या जातील, पावसाळयापुर्वी एक पाहणी केली जाईल.

**मा.सुनिता तापकिर –** रोहित पार्क येथील नाल्याची पाहणी करण्यात यावी.

**मा.चंद्रकांत नखाते –** रहाटणी फाटा ते रहाटणी चौक डीव्हायडर येथील रस्त्याची झाडलेली माती डिव्हायडरमध्ये टाकली जाते, यामुळे झाडांची वाढ होत नाही. सदर टाकलेली माती काढुन घेणेत यावी.

**मा.श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** रस्त्यांची झाडलेली माती डिव्हायडरमध्ये टाकु नये अशी सुचना सफाई कर्मचा-यांना देणेत यावी.

**मा.निलेश बारणे** – विषय क्रमांक १३ चे संदर्भात सदर रस्त्यासाठी ठराव मंजुर झाल्यानंतर तो रद्द करण्याचा अधिकार आपल्याला आहे का ते तपासुन पहावे.

**मा.चंद्रकांत नखाते** – जास्त प्रमाणात बांधकाम बाधीत होत असल्यास रस्ता रद्द करता येतो.

**मा.संदिप वाघेरे** – रस्त्याची लोकांना अडचण होत असेल तर मा.आयुक्तांच्या मान्यतेने तो रद्द करता येतो.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** - Town Planning च्या नियमानुसार माहिती घेणेत यावी.

**मा.सुनिता तापकिर** – रहाटणी गावात पाण्याचे प्रेशर कमी असुन कमी वेळ पाणी येते. तसेच पाणी अनियमीत येते. याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

**मा.विनोद तापकीर** – तापेकीर नगर, जय मल्हार कॉलनी येथे पाणीपुरवठा कमी आहे.

**मा.चंद्रकांत नखाते** – प्रभाग क्र.२७ मधील माजी नगरसेवक, वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य यांचे जुने बोर्ड का काढले नाहीत ..सर्व माजी नगरसदस्यांचे बोर्ड काढणेत यावे.

**मा.संदिप वाघेरे** – प्रभाग क्र.२१ मधील आरोग्य व पाणीपुरवठयाचे काम चांगले आहे. परंतु स्थापत्य विभागाकडुन काम झालेले नाही. १ महिन्यापासुन सांगुनही रस्त्याचे कॉंक्रीटीकरण झालेले नाही, कोंडवाडा खाली करुन देणे, सभागृह करण्याचे काम झालेले नाही. नवमहाराष्ट्राच्या येथील हॉल ताब्यात घेऊन मनपा व्दारे चांगला उपयोग होईल.

**मा.चंद्रकांत नखाते** – प्रभाग क्र.२७ मध्ये कुठल्या वेळेला व कशाप्रकारे अतिक्रमण कारवाई केली जाते? बसस्टॉप समोर रोजच कारवाई करा, तेथे अनेक हातगाडया लागलेल्या असतात.

**श्री.श्रीकांत कोळप** (अतिक्रमण पथक प्रमुख) – प्रभाग क्र.२७ येथे एप्रिल महिन्यात ९ वेळा कारवाई केली. इतर प्रभागात पण कारवाईसाठी जावे लागत असल्यामुळे रोज कारवाई करणे शक्य होत नाही.

**मा.निलेश बारणे** – विजेच्या खांबांवरील फ्लेक्स काढणेत यावे. आकाशचिन्ह परवाना विभागाकडे हे काम आहे.

**मा.सुनिता तापकिर** – शाळांना सुट्टी असेपर्यंत शाळांची रंगरंगोटी, फरश्या दुरुस्ती इ. कामे करण्यात यावी.

**श्री.ओहोळ (उपअभियंता) – शाळेसाठी कलर कोड फीक्स करणार आहे, कलर कोड फिक्स झाला की सदर काम करण्यात येईल.**

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** - सर्व कामे तातडीने सुरु करण्यात यावी.

**मा.चंद्रकांत नखाते** – रहाटणी फाटा ते शिवाजी चौक येथील अतिक्रमण काढणेत यावे.

**मा.सुनिता तापकिर** – काळेवाडी फाटा ते एम एम शाळा येथील स्वच्छतेचे काम व्हायला हवे, याबाबत पेपरला फोटो येत आहेत. तापकिर नगर येथे कचरागाडी येत नाही.

**श्री.कुलकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी)** – रोजच्या रोज कचरागाडी येईल अशी व्यवस्था केली आहे.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ ४८/२०१८
दिनांक - /०५/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या
ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही